MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग
सत्यमेव जयते
Life • Liberty • Equality • Dignity

# वार्तापत्र

सूचना का अधिकार
RIGHT TO INFORMATION











## नोव्हेंबर २०१९

**समर्थन प्रकाशन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
🖂: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती**

विश्लेषण
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

प्रसिद्धी
**मनोज सातवी**- ९२७३७९६९९९

मांडणी
**प्रतिक्षा कोयंडे**



**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☎०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# संपादकीय

## समर्थन कशासाठी ?

### मानवी हक्कांसाठी !!

'समर्थन'ची स्थापना ही मुळातच मानवी हक्कांची जपणूक करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने लोकशाही अधिक सकस व बळकट करण्यासाठी झाली आहे. शासन जबाबदार (Accountable) व पारदर्शक (Transparent) असावे, नि:पक्षपाती नोकरशाही, लोकनियुक्त विधिमंडळ, स्वतंत्र न्यायालये आणि निर्बंधरहित वृत्तपत्रे व इतर संपर्क माध्यमे हे आपल्या लोकशाहीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या चारही आधारस्तंभाची कामे एकमेकांना पूरक राहिली आहेत. यामध्ये समतोल साधल्याने लोकशाही बळकट होते, परंतु जर या सर्वांमध्ये विसंवाद वा संघर्ष (Confrontation) झाला तर ती धोक्यात येते. म्हणून लोकशाहीच्या या प्राणभूत शक्तींना कोणीही नख लावण्याचा प्रयत्न करणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेणे गरजेचे आहे. नाहीतर १९७५च्या आणीबाणी सारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अशा अपप्रवृत्ती रोखण्यासाठीच 'समर्थन'चा जन्म झाला आहे.

त्यामुळेच 'समर्थन'च्या कामाचे स्तर हे लोकशाही पूरक राहिले आहेत. त्यामध्ये राज्यस्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे, माहिती अधिकार कायद्याचा जास्तीत जास्त उपयोग करून माहिती मिळवणे, प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे, निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांबाबत विविध स्तरावर चर्चा घडवून आणणे, ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्यामध्ये वाढ करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे, त्याचप्रमाणे राज्याच्या धोरणात्मक निर्णयामध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित व्हाव्यात, यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा 'समर्थन'चा मुख्य उद्देश राहिला आहे.

आज आपण बघत आहोत की, लोकशाहीची ताकद असलेल्या संस्थांना जे अधिकार संविधानाने व कायद्याने दिले आहेत. आज ते अधिकार सत्ताधाऱ्यांकडून गोठवण्याचे प्रयत्न सुरू आहेत वा अधिकाराचा गैरवापर करून ते केले जात आहे किंवा जनतेला न्याय मिळेल अशा प्राधिकरणांमध्ये जागा मोठ्या प्रमाणावर रिक्त ठेवून या संस्था कमकुवत केल्या जात आहे. जेणे करून लोकांना लोकशाही मार्गाने न्याय मिळण्यास अडथळा निर्माण होईल, असे होणे हे सुदृढ समाजाच्या निर्मिती साठी अत्यंत घातक आहे.

याबाबतची माहिती, माहितीच्या अधिकाराखाली मिळवून तसेच सी.ए.जी. सारख्या संस्थेच्या अहवालांचा अभ्यास करून 'समर्थन'ने हे पहिले वार्तापत्र आपल्यासमोर आणले आहे; अपेक्षा ही आहे की, आपण त्याचे वाचन व अध्ययन करून शासनावर लोकशाही मार्गाने दबाव आणून त्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आम्ही चालविलेल्या अभियानात आपणही सर्व सहभागी व्हाल.

'समर्थन'ने या बातमीपत्रात राज्यातील लोकशाहीला पोषक व पूरक अशी जी प्राधिकरणे आहेत त्या प्राधिकरणांची स्थिती सध्या कशी आहे त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये १) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगातील प्रलंबित प्रकरणे, २) महाराष्ट्र राज्य माहिती आयोग व आयुक्तालयातील प्रलंबित प्रकरणे, ३) महाराष्ट्र राज्य जाती-जमाती आयोगातील प्रलंबित प्रकरणे, ४) महाराष्ट्र शासनाच्या रिक्त जागांचा तपशील त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी दुष्काळावर मात करण्यासाठी ४ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या **'जलयुक्त शिवार'** या महत्त्वाकांक्षी योजनेचा स्थितीदर्शक आढावा घेण्यात आला आहे तसेच जलसंपदा विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या मात्र अनेक गंभीर कारणांमुळे मागील ३६ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या **'गोसीखुर्द सिंचन प्रकल्पातील'** अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार याबाबत सी.ए.जी.ने नोंदविलेल्या आक्षेपांचा आढावा देखील या वार्तापत्रात घेण्यात आला आहे. जेणे करून, समाज माध्यम, प्रिंट मिडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यम यांच्या समोर मानवी हक्कांचे प्रश्न नेता येतील.'समर्थन' हाताळत असलेल्या सामाजिक विषयांना दाद मिळण्यासाठी जनमत तयार व्हावे हा या मागचा मुख्य उद्देश आहे. 'समर्थन' प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात असे बातमी पत्रक प्रसिद्ध करणार आहे. आपल्या सर्वांच्या शुभेच्छा या वार्तापत्रासाठी आवश्यक आहेत.

सदर वार्तापत्रातील माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू. प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे. 'समर्थन' प्रकाशित करीत असलेल्या माहितीबाबत अधिक जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी 'समर्थन' स्वीकारीत आहे. धन्यवाद!

**संपर्क व प्रतिक्रिया:** ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## अ) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग वाऱ्यावर:

महाराष्ट्रात मानवी हक्क आयोगाची स्थापना दि. ६ मार्च, २००१ रोजी झाली. लोकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याचे काम आयोग करीत असतो. लोक स्वत:च्या तक्रारींचे निराकरण करण्यात असमर्थ असतील आणि तक्रारी आयोगाच्या अधिकार कक्षेत असतील तर अशा तक्रारीमध्ये लोकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य मानवी हक्क आयोग करीत असतो.

समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याचे काम हा आयोग करीत आला आहे. मात्र आज हा आयोग वाऱ्यावर आहे. कारण मुंबई हायकोर्टात नरेंद्र गोसावी या अर्जदाराने जनहित याचिका केली होती. त्याची न्या. अनुप मेहता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली असता, त्यात गृहखात्याचे उपसचिव कैलास गायकवाड यांनी एका प्रतिज्ञापत्राद्वारे आयोगात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याची कबुली दिली आहे. आयोगात श्री.एम.ए.सयीद हे कार्यकारी अध्यक्ष आहेत तसेच आयोगाकडे कायमस्वरुपी सचिव नाहीत. श्री. डी. एन. बनकर हे प्रभारी सचिव आहेत. तर आयोगातील पोलीस महानिरीक्षक हे पद रिक्त आहे. आयोगातील ५१पदे मंजूर असून त्यापैकी १९ पदे रिक्त आहेत. त्यामुळे न्या. गायकवाड यांनी रिक्त पदांमुळे या आयोगाचा पदभार स्वीकारण्यास नकार दिला होता.

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगात दि. ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत १६ हजार ९५७ प्रकरणे प्रलंबित:**

तक्ता क्र.१

| वर्ष | मागील प्रलंबित प्रकरणे | नवीन प्रकरण | एकूण प्रलंबित प्रकरणे | निराकरण झालेली प्रकरणे | वर्षाखेरीस प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| **२०१४** | १५६९० | ४५३५ | २०२२५ | १७६१ | १८४६४ |
| **२०१५** | १८४६४ | ५८०१ | २४२६५ | ४०९८ | २०१६७ |
| **२०१६** | २०१६७ | ५६५८ | २५८२५ | ९६६८ | १६१५७ |
| **२०१७** | १६१५७ | ४५८५ | २०७४२ | ५१८७ | १५५५५ |
| **२०१८** | १५५५५ | ६७७० | २२३२५ | ५३६८ | १६९५७ |

*(स्त्रोत:माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, महाराष्ट्र मानवी हक्क आयोग, दि. २७/०२/२०१९)*

आतापर्यंत २२ हजारांपेक्षा जास्त प्रकरणे दाखल झाली आहेत. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगातील प्रलंबित प्रकरणांची 'समर्थन'ने माहिती घेतली असता असे आढळून आले की, दि. ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत १६,९५७ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी मागील प्रलंबित प्रकरणांची संख्या १५,५५५ (९१.७३%) होती. याच वर्षी ६,७७० प्रकरणे नव्याने दाखल झाली आहेत. त्यापैकी ५,३६८ प्रकरणांचे निराकरण करण्यात आले.

वस्तुत: या कायद्यात प्रामुख्याने प्रत्येक जिल्हा कोर्टाकडे मानवी हक्कविषयक तक्रारीसाठी कोर्ट असावे, अशी तरतूद आहे. प्रत्यक्षात ही तरतूद कागदावरच असून, ती अंमलात आलेलीच नाही. जिल्हा कोर्टाच्या न्यायाधीशांना आयपीसी कायद्यानुसार गुन्ह्याचे खटले चालविता येतात. मात्र, नेमके कोणते गुन्हे मानवी हक्कभंगात मोडतात याची मानवी हक्क कायद्यात व्याख्याच नाही व राज्य सरकारने त्याविषयी कोणतेही नियम बनविलेले नाहीत. हे लक्षात घेता नेमके नियम बनविण्याची आवश्यकता असल्याचे काही अनुभवी विधिज्ज्ञांचे म्हणणे आहे. प्रलंबित प्रकरणांची वाढती संख्या असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मानवी हक्क आयोगात असलेली रिक्त पदे. जर आयोगाचे कामकाज जलद गतीने व्हावे व जनसामान्यांना न्याय मिळवून द्यायचा असेल तर रिक्त जागा लवकरात लवकर भरल्या गेल्या पाहिजेत तसेच आयोगातील कार्यालयात आवश्यक त्या मूलभूत सोयी-सुविधा निर्माण केल्या पाहिजेत.

## ब) महाराष्ट्र राज्य माहिती आयोग व आयुक्तालय:

लोकशाहीमध्ये सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व उत्तरदायीत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरणाकडील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, व्यवहारी शासन पद्धत आखून देण्याकरीता केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार, २००५ अंतर्गत केंद्रीय माहिती आयोग तसेच राज्यामध्ये राज्य माहिती आयोग स्थापन करण्यात आले आहेत.

राज्यातील सजग नागरिक व संस्था विविध शासकीय प्राधिकरणाकडून माहितीची मागणी करीत असतात. परंतु जेव्हा आवश्यक माहिती उपलब्ध होत नाही त्यावेळेला माहिती आयोगाकडे अपिल केले जाते व तो प्रश्न संबंधितांना बोलावून माहिती आयुक्तामार्फत सुनावणी घेऊन सोडवला जातो. राज्यात मोठ्या प्रमाणावर या कायद्याचा उपयोग करण्याचे प्रमाण वाढले आहे. वर्ष २००६ ते २०१६ या ११ वर्षाच्या कालावधीत ६१ लाख ७९ हजार ५०४ एवढ्या मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक प्राधिकरणांकडे माहिती मिळवण्यासाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामध्येही नगर विकास महसूल, ग्राम विकास तसेच उद्योग, ऊर्जा या विभागांकडे लोकांचा माहिती मागण्याचा कल अधिक आहे. जर या विभागांकडे माहिती प्राप्त झाली नाही वा माहिती मिळाल्यानंतर समाधान झाले नाही तर त्या त्या विभागांच्या माहिती आयोग कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुख्य माहिती आयुक्त तसेच राज्य आयोगाकडे दाद मागण्याचे प्रमाणही फार मोठे आहे. त्यामुळे आयोग व आयुक्तालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरणे गरजेचे आहे. 'समर्थन'ने याबाबतची शहानिशा करण्यासाठी या सर्व प्राधिकरणांकडून माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली असता धक्कादायक वास्तव समोर आले.

**सामाजिक न्यायासाठी माहितीचा उपयोग करणाऱ्या कार्यकर्त्यांना माहिती आयोग न्याय कसा देणार**

**राज्य माहिती आयोगात आणि आयुक्तालयात मिळून २७७ पैकी ११३ (४१%) पदे रिक्त:**

तक्ता क्र.२

| अक्र. | आयोग/आयुक्तालय | मंजूर संख्या | रिक्त पदे | ४चे ३शी प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | राज्य माहिती आयोग | १३९ | ५७ | ४१.०० |
| २. | राज्य मुख्य माहिती आयुक्तालय | १९ | १२ | ६३.१५ |
| ३. | नागपूर, माहिती आयुक्तालय | १७ | ५ | २९.४१ |
| ४. | औरंगाबाद, माहिती आयुक्तालय | १७ | ५ | २९.४१ |
| ५. | पुणे, माहिती आयुक्तालय | १७ | ५ | २९.४१ |
| ६. | कोकण,माहिती आयुक्तालय | १७ | ८ | ४७.०५ |
| ७. | बृहन्मुंबई,माहिती आयुक्तालय | १७ | ८ | ४७.०५ |
| ८. | अमरावती, माहिती आयुक्तालय | १७ | ७ | ४१.१७ |
| ९. | नाशिक, माहिती आयुक्तालय | १७ | ६ | ३५.२९ |
| | **एकूण** | २७७ | ११३ | ४०.७९ |

*(स्त्रोत:महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, माहितीच्या अधिकारखाली प्राप्त माहिती, दि.२०/०२/२०१९)*

१) महाराष्ट्र राज्य माहिती आयोगामध्ये १३९ पैकी, ५७ पदे रिक्त, २) राज्य मुख्य माहिती आयुक्तांच्या कार्यालयातील १२ पैकी ११ पदे रिक्त, ३) नागपूर कार्यालयातील १७ पैकी ५ पदे रिक्त, ४) औरंगाबाद मधील

१७ पैकी ५ पदे रिक्त, ५) पुणे येथील १७ पैकी ५ पदे रिक्त, ६) कोंकण येथील १७ पैकी ८ पदे रिक्त, ७) अमरावती येथील १७ पैकी ७ पदे रिक्त, ८) नाशिक येथील १७ पैकी ६ पदे रिक्त तर बृहन्मुंबई मधील १७ पैकी ८ पदे रिक्त आहेत. अशी एकूण सर्व कार्यालयातील मिळून आज २७७ पदे मंजूर आहेत मात्र त्यापैकी ११३ (४१%) पदे रिक्त आहेत. त्यामुळे माहिती आयोगाकडे ४,७३२ तर सर्व आयुक्तालयांकडे माहितीसाठी दाद मागणाऱ्यांची संख्या ४१,०६४ एवढी मोठी आहे. त्यामुळे ही प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर मार्गी लावायची असतील तर शासनाने माहिती आयोगातील रिक्त असलेली पदे लवकरात लवकर भरणे गरजेचे आहे.

मानवी हक्काची पायमल्ली करणारे तुरुंग अधिकारी, पोलीस अथवा अन्य सरकारी यंत्रणांच्या गैरवर्तनाला चाप बसविण्यासाठी स्थापन केलेल्या राज्य मानवी हक्क आयोगाचा कारभार अपुरे कर्मचारी व तुटपुंजा आर्थिक निधी यामध्येच अडकून पडला आहे. त्यामुळे अनेक अडचणींना आज आयोगाला तोंड द्यावे लागत आहे.

## क) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग:

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती-जमातींच्या मागण्यांच्या अनुषंगाने या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी दि. १ मार्च, २००५ रोजी आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून या समाजाच्या तक्रारींचे निरसन करण्याची महत्त्वाची जबाबदारी देखील महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाची आहे. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ प्रमाणे दाखल प्रकरणांचा आढावा घेणे. पीडीत व्यक्तीस देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याचा आढावा घेणे तसेच या जाती-जमातीतील कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक तक्रारी स्वीकारणे व तपास करणे. आरक्षण धोरणांचा आढावा घेण्याचे महत्त्वाचे काम हा आयोग करीत असतो. या आयोगावर अध्यक्ष व ४ सदस्य अशी कार्यकारणी आहे असे असताना आयोगाचे कामकाज अत्यंत संथ गतीने सुरू असल्याची माहिती 'समर्थन'ला माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झाली आहे.

वर्ष २०१५ ते २०१८ या ४ वर्षाच्या कालावधीत आयोगाकडे आलेल्या प्रकरणांची माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेतली असता असे आढळून आले की, आयोगाकडे ३ हजार ४२८ प्रकरणे प्राप्त झाली आहेत. त्यापैकी २ हजार ११५ (६१.७०%) प्रकरणे निकाली काढण्यात आली तर १ हजार ३१३ (३८.३०%) प्रकरणे आजही प्रलंबित आहेत. केवळ वर्ष २०१८च्या माहितीचा विचार केला असता दि. ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत आयोगाला ९६३ प्रकरणे प्राप्त झाली आहेत त्यापैकी ६३४ (६५.८३%) प्रकरणे आजही प्रलंबित आहेत असे दिसून आले. याचाच अर्थ अनुसूचित जाती-जमातींच्या प्रश्नांना आयोगातही योग्य वेळेत न्याय मिळत नाही. तसेच या समाजावर ज्या प्रमाणावर अन्याय-अत्याचाराच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. त्या प्रमाणात प्रकरणे दाखल होत नाहीत हेच या माहितीतून लक्षात येते.

## ड)राज्याच्या २८ विभाग व जिल्हा परिषदांमधून १ लाख ६५ हजार पदे रिक्त:

'समर्थन'ने महाराष्ट्र शासनातील विविध २८ विभागातील व जिल्हा परिषदांमधील गट 'अ', 'ब', 'क' व 'ड' मधील मंजूर पदे भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती मागविली होती. सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या माहितीतून राज्यातील रिक्त पदांचे भीषण वास्तव समोर आले आहे. राज्याच्या २८ प्रशासकीय विभागात सध्या ६ लाख ९८ हजार ३६३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५ लाख ४९ हजार ८७१ पदे भरली गेली असून १ लाख ३९ हजार १४३ (२५%) पदे रिक्त आहेत.

### इ) ‘जलयुक्त शिवार अभियाना’ची मागील ४ वर्षांतील स्थिती:

राज्याच्या काही भागात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर व दुष्काळावर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ‘जलयुक्त शिवार अभियान’ ही नवी महत्त्वाकांक्षी योजना वर्ष २०१४-१५ मध्ये राबवायला सुरुवात केली. या योजनेद्वारे वर्ष २०१९पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र पाणी टंचाईमुक्त करण्याचा निर्धार केला होता. या अभियानात विविध विभागाकडील योजना, अशासकीय संस्था आणि लोकसहभाग यावर विशेष लक्ष केंद्रीत केले होते. या अभियानाचा आराखडा तयार करणे, प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व सनियंत्रणासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांची तालुका स्तरावर तर जिल्हाधिकाऱ्यांची जिल्हास्तरावर ‘नोडल अधिकारी’ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आज महाराष्ट्रातील ३२ जिल्हे दुष्काळी छायेत अडकले आहेत. त्याचे कारण म्हणजे ही योजना एक आदर्श योजना होऊ शकली असती **मात्र या योजनेचा फायदा केवळ ठेकेदारांना (Contractor) झाल्याचे वास्तव समोर येत आहे.** या अभियानासाठी मागील ४ वर्षात झालेला खर्च व या अभियानातून निर्माण झालेला पाणीसाठा व सिंचन क्षमता याबाबत ‘समर्थन’ने माहिती मागविली होती मिळालेल्या माहितीनुसार —

**‘जलयुक्त शिवार’ योजनेवर ४ वर्षात ८ हजार ९९ कोटी खर्च तरीही २०१८-१९ मध्ये महाराष्ट्राच्या २९४ तालुक्यात दुष्काळ**

**<u>८०% महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत</u>**

**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या पाणीसाठ्याचा व खर्चाचा विभागनिहाय तपशील:**

तक्ता क्र. ३

| विभाग | गावांची (संख्या) | पाणीसाठा (TMC) | सिंचित जमीन (Hector) | खर्च (कोटीत) | एकूण खर्चाशी % |
|---|---|---|---|---|---|
| **कोकण** | ६४६ | ७८१९७ | ३६८९७ | २८२.२० | ३.४८ |
| **पुणे** | २५५० | ३९६२६३ | ५५८५५४ | १,७४५.०० | २१.५५ |
| **नाशिक** | २६८६ | ४५५६९५ | ७८४५९९ | १,५९२.१५ | १९.६५ |
| **औरंगाबाद** | ४४४८ | ८१४७१९ | १२८९००८ | २,०४४.७१ | २५.२५ |
| **अमरावती** | ३४२८ | ३३८३२५ | ४५६५३४ | १,३५६.८३ | १६.७६ |
| **नागपूर** | २७६० | ३५२६४५ | २९७७२४ | १,०७८.३१ | १३.३१ |
| **एकूण** | **१६५१८** | **२४३५८४४** | **३४२३३१६** | **८,०९९.२०** | **१००.००** |

*(संदर्भ:माहितीच्या अधिकाराखाली मृदू व जलसंधारण विभागाकडून प्राप्त माहिती दि. २० फेब्रुवारी, २०१९)*

वर्ष २०१५-१६ ते २०१८-१९ या ४ वर्षात या अभियानासाठी रु. ८,०९९.२० कोटी खर्च करण्यात आले आहेत. त्यापैकी सर्वात जास्त खर्च मराठवाड्यातील गावांसाठी झाला असून रु.२,०४४.७१ (२५.२५%) कोटी खर्च झाले आहेत. पुणे विभागातील २,५५० गावांसाठी रु.१७४५.०० (२१.५५%) कोटी खर्च झाले आहेत. तर विदर्भातील अमरावती व नागपूर विभागातील ६,१८८ गावांसाठी रु. २,४३५.१४ (३०.०६%) कोटी, नाशिक मधील २,६८६ गावांमध्ये रु.१,५९२.१५ (१९.६५%) कोटी तर कोकण विभागातील ६४६ गावांमध्ये

रु.२८२.२०(३.४८%) खर्च करण्यात आला आहे. या अभियानातून एकूण २४ लाख ३५ हजार ८४४ टीएमसी पाणी साठा निर्माण झाला तर ३४ लाख २३ हजार ३१६ हेक्टर जमीन ओलिताखाली आली अशी माहिती देण्यात आली आहे. असे असूनही वर्ष २०१८ मध्ये राज्यात ३५३ तालुक्यांपैकी २९४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. म्हणजे जवळ जवळ ८०% महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत आहे.

दि.३१ ऑक्टोबर २०१८ रोजी १५१ तालुके हे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले गेले. तर दि. ६ नोव्हेंबर, २०१८ रोजी आणखी ९३ तालुक्यातील २६८ महसुली मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला, दि. ८ जानेवारी २०१९ रोजी नव्याने ५० तालुक्यातील ९३१ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला. तर दि. २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी नव्याने ४ हजार ५१८ गावांचा दुष्काळग्रस्त गाव म्हणून समावेश करण्यात आला आहे. यावरून दुष्काळाचे स्वरुप किती गंभीर आहे याची कल्पना येते. जलशिवार योजनेच्या यशस्वीतेविषयी शासन कितीही ओरडून सांगत असले तरी अर्ध्यापेक्षा जास्त महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत आहे हे निश्चित.

मात्र असे असतानाही दि. २२ एप्रिल, २०१९ या आठवड्यात मराठवाड्यामध्ये जेथे सर्वाधिक म्हणजे ८ लाख १४ हजार ७१९ टीएमसी पाणी साठा निर्माण झाला तेथील १,७८७ गावांमध्ये २,४७० टँकर्सने पाणी पुरवठा करावा लागला आहे. तर नाशिक विभागात ४ लाख ५५ हजार ६९५ टीएमसी पाणी साठा निर्माण झालेला असताना ८५७ गावांसाठी १,१२६ गावांना टँकर्सने पाणी पुरवठा करावा लागला आहे. त्या खालोखाल पश्चिम महाराष्ट्रात म्हणजे पुणे विभागात ३ लाख ९६ हजार २६३ टीएमसी पाणीसाठा निर्माण झालेला असताना ८५७ गावांना १,१२६ टँकर्सने पाणीपुरवठा करावा लागला आहे.

## ह)गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार व अनियमितता:

भंडारा, नागपूर व चंद्रपूर या जिल्ह्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी व जमिनीची सिंचन क्षमता वाढविण्यासाठी वर्ष १९८३ मध्ये 'गोसीखुर्द सिंचन प्रकल्प' मंजुरी देण्यात आली मात्र मागील ३६ वर्षांच्या कालावधी उलटला तरी प्रकल्प पूर्ण झालेला नाही. फेब्रुवारी, २००९ मध्ये भारत सरकारने या प्रकल्पास **'राष्ट्रीय सिंचन प्रकल्प'** असे घोषित केले. या प्रकल्पावर मार्च, २०१७ पर्यंत रु. ९,७१२.०९ कोटी रुपये खर्च झाले असून जर हा प्रकल्प पूर्ण करायचा असेल तर आणखी रु. ८,७८२.४७ कोटी रुपयांची आवश्यकता आहे असे जलसंपदा विभागामार्फत सांगण्यात आले. अशा अनेक कारणांमुळे प्रकल्पाची किंमत ही रु. १८,४९४.५६ कोटींवर गेली आहे.

**गोसीखुर्द सिंचन प्रकल्पाची किंमत ३६ वर्षांत रु. ३७२ कोटीवरून १८ हजार ४९५ कोटींवर**

तक्ता क्र.४

| **गोसीखुर्द सिंचन प्रकल्प** | | |
|---|---|---|
| **प्रशासकीय मान्यता** | मंजुरीचे वर्ष | मंजूर किंमत |
| मूळ **प्रशासकी**य मान्यता | मार्च, १९८३ | ३७२.०० |
| १ली सुधारित प्र. मान्यता | जुलै, १९९९ | २,०९१.०० |
| २री सुधारित प्र. मान्यता | नोव्हेंबर, २००७ | ५,६५९.०० |
| ३री सुधारित प्र.मान्यता | सप्टेंबर, २०१६ | **१८,४९४.५६** |
| **प्रकल्पासाठी झालेला प्र.खर्च** | **१९८३ ते मार्च, २०१७** | **०९,७१२.०९** |
| **प्रकल्प पूर्ण होण्यासाठी रक्कम** | **मार्च, २०२० पर्यंत** | **०८,७८२.४७** |

*(संदर्भ:भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा मार्च, २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा आर्थिक क्षेत्रावरील अहवाल)*

गोसीखुर्द सिंचन घोटाळ्यासाठी माजी जलसंपदा मंत्री जबाबदार असल्याचे प्रतिज्ञापत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मान. उच्च न्यायालयात सादर केले होते. या सिंचन घोटाळा प्रकरणी जलसंपदा मंत्री असताना नियमबाह्यरित्या विविध प्रकारच्या कोट्यवधीच्या खर्चाला मंजुरी दिली. सिंचन प्रकल्पाच्या कंत्राटासाठी बनावट कागद पत्रांचा वापर केला गेला. काळ्या यादीतील अपात्र कंत्राटदारांनाही कंत्राट देण्यात आली. प्रकल्पाला विलंब झाल्याने खर्चातही भरमसाठ वाढ झाली असल्याचा ठपका एसीबीने ठेवला आहे.

वर्ष २०१२च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार वर्ष १९९९ ते २००९ या कालखंडात राज्यातील सिंचन प्रकल्पामध्ये ३५ हजार कोटींची अनियमितता असल्याची बाब समोर आली. वर्ष २०१२ मध्ये तात्कालीन मुख्य अभियंता विजय पांढरे यांनी तात्कालीन राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांना याबाबतचा अहवाल सादर करून सिंचन विभागात गैरव्यवहार झाल्याचे नमूद केले होते. आतापर्यंत २४ प्रकरणात गुन्हे दाखल केले होते. प्रकल्पाची वाढती किंमत परंतु प्रकल्प पूर्ण न होणे या व अशा अनेक कारणांमुळे 'गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्प' वर्ष २०१२-१७ या ५ वर्षांच्या कालावधीतील अंमलबजावणीचे लेखापरीक्षण करण्यात आले. याचा अहवाल अंतिम करताना भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा २००७ (नागरी) अहवालात अंतर्भूत 'गोसीखुर्द सिंचन प्रकल्प' अंमलबजावणी संबंधी लेखापरीक्षणावरील लोकलेखा समितीच्या शिफारशी सुद्धा विचारात घेण्यात आल्या. त्यामध्ये असे आढळून आले की, **जलसंपदा विभाग जनतेला सिंचनाचा लाभ प्रदान करणे, न्याय पाणी वाटप करणे त्यासाठी तो कार्यान्वित करणे ते संबंधितांच्या स्वाधीन करणे या सर्व आघाड्यांवर संबंधित विभाग पूर्णत: अपयशी ठरला. नियोजनातील अंगभूत उणीवा, जमिनीचे सदोष सर्वेक्षण, खाजगी व वन जमीन संपादित न करणे, चुकीचे अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्पाच्या व्याप्तीत सतत बदल करणे, त्यामुळे प्रकल्पात सातत्याने अडथळे निर्माण झाले. भूसंपादनाच्या किंमतीत झालेली वाढ, संरेखन आणि संकल्प चित्रामधील बदल, काही अतिरिक्त बाबींची तरतूद न करणे, उच्च किंमतीच्या निविदा स्वीकारणे, दुरुस्तीची कामे संथ गतीने करण्यात येणे, जास्तीचा निधी खर्च करणे, नियम पुस्तिकेतील नियमांचे आणि कंत्राटदारांच्या अटींचे उल्लंघन व त्यामुळे कंत्राटदारांना गैरवाजवी फायदा करून देण्यात आला.**

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन करताना त्यांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत. काहींना नुकसानभरपाई विलंबाने देण्यात आली तर काही कुटुंबांना दुबार नुकसानभरपाई देण्यात आली. त्यामुळे सार्वजनिक पैशावर अतिरिक्त बोजा पडला व जनतेचे नुकसान झाले. याच कारणाने महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर, २०१६ मध्ये वर्ष २००६ ते २०१० या ५ वर्षाच्या कालावधीतील झालेल्या कामांमध्ये झालेल्या अनियमिततेची 'लाच-लुचपत प्रतिबंधक विभागा' (ACB) मार्फत चौकशी सुरू केली. त्यामुळे केंद्रीय जल आयोगाने तिसऱ्या सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली नाही. त्यामुळे भारत सरकारद्वारे या प्रकल्पाची वाढीव किंमत रु. ८,७८२.४७ कोटी मिळण्याची शाश्वती नाही. त्यामुळे या प्रकल्पावर रु. ९,७८२.४७ कोटी खर्च होऊनही तसेच ३६ वर्षे झाले आहेत तरी अपूर्ण राहिला आहे. त्याचप्रमाणे या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या ८५ गावांमधील १४,९८४ कुटुंबांपैकी ६४ गावांतील १०,६३६ कुटुंबांचे पुनर्वसन झाले तर २१ गावांतील ४,३४८ कुटुंबांचे आजही पुनर्वसन झालेले नाही. ज्यांनी या प्रकल्पावरील आपल्या जमिनींवर पाणी सोडले आणि तेवढे पाणीही उपलब्ध झाले नाही. या प्रकल्पातून २,५०,८०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार होती. परंतु अनियमिततेमुळे मागील ३६ वर्षांत केवळ ५०,२१७ (२०%) हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. तसेच झालेले काम हे निकृष्ट दर्जाचे झाले. ३८७ पाणी वापर संस्थांची निर्मिती करायची होती त्यापैकी केवळ ४५(१२%) पाणी वापर संस्थांची निर्मिती करण्यात आली. तसेच संलग्न नद्यांमध्ये सांडपाणी सोडण्यात आल्यामुळे धरणाचे पाणी दूषित झाले आहे.